**Indian Streams Research Journal**
Vol-1 Issue-2/March -2011
**ISSN: 2230-7850** Available online www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# श्री गुलाबराव महाराज : उपासना व भक्तीमधील भेद आणि दोहोंची आवश्यकता

अरविंद देशमुख
सहयोगी प्राध्यापक
गो.सी.टोंपे
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सांदूरबाजार अमरावती

वेदान्त व भक्तिवाङःमयात उपासना व भक्ति हे दोन्ही शबद बरेच वेळा एकाच अर्थाने वापरले जातात... उपासना ही ज्ञानाच्यापूर्वी असते तर भक्ति ज्ञानोत्तर असते. तर भक्ति ज्ञानोत्तर असते. उपासना व भक्तिमधील हा भेद वेद, पुराण यासारखे प्राचीन वाङःमयात सांगितलेले आहेत. परंतू हा भेद एकत्र आढळत नाही. पण श्री गुलाबराव महाराज यांनी उपासना व भक्ति यामधील भेद पूर्वाचार्यांच्या आधाराने दाखवून दिलेला आहे. श्री गुलाबराव महाराज यांनी हाजी भेद दाखवून दिला आहे. त्यामुळे एक नवी दृष्टी प्राप्त होतेच. पण त्याचबरोबर उपासना व भक्ति यांचे सर्व श्रेष्ठत्वाचे आकलन होण्यास मदत होते.

## उपासना व भक्ति एकाच पंक्तीत बसणे अशक्य

श्री गुलाबराव महाराज यांच्यामते उपासना व भक्ति एकाच पंक्तीत बसू शकत नाहीत. त्यांनी याच अनुषंगाने खालील विवेचन केले आहे:

निष्काम कर्म केले असता अंत:करण शुध्द होते व उपासनेने चित्त एकाग्र होते. हा वेदान्ताचा सिध्दान्त आहे. उपासनेने अंत:करणाची एकाग्रता साधण्यास मदत होते व भगवंताविषयीची आवड हया एकाग्र अंत:करणाने धरुन ठेवली जाते. कर्म आणि उपासना हया दोन्ही गोष्टी एकाच वेळी केल्या जात असल्याकारणाने भगवंताच्या प्राप्तीची ओढ जीवाला लागते. शास्त्रानुसार जीवाला जी विहित कर्मे करण्यास सांगितले आहेत. ती फळाची आशा सोडून देऊन केवळ भगवंताची आज्ञा म्हणून करण्यास सांगितले आहेत. फळाची आशा धरुन कर्मे केली असता ती पुन्हा त्याला संसारबंधनात पाडणारी होतात. म्हणून विहित कर्मे केवळ भगवंताची आज्ञा म्हणून निष्काम बुध्दीने करुन ती भगवंतास समर्पण केली असतांना कर्माचा अहंकार नि:शेष नाहीसा होतो व त्यामुळे त्याच्या ठिकाणी भगवंताचे अनुसंधान लागते व चित्त भगवंताच्या ठिकाणी एकाग्र होते. अशारीतीने भगवंताच्या चरणांची आवड सारखी वाढत जाते. हया कर्म व उपासना समुच्चयात कर्म हळू हळू गौण होऊन

भगवत्प्रेमप्रधान होत जाते. परिणामत: विषयवासना नि:शेष नाहीशी होण्याला मदत मिळून मग केवळ भगवंताचीच आवड सारखी अंत:करणात कायम राहते. तेंव्हा भक्तीचा अविर्भाव होतो व भगवंताविषयीच केवळ एक आवड अंत:करणात राहते म्हणून उपासना व भक्ती एकाच पंक्तीत बसू शकत नाहीत. उपासना व कर्म समर्पण केल्यावर केवळ एक भगवत्प्रेमच शिल्लक राहते. म्हणूनच श्री गुलाबराव महाराज उपासना म्हणजे भक्ती नव्हे, उपासना व भक्तीत महद् अंतर आहे. हे सप्रमाण दाखवून देतात.

## <u>श्री गुलाब महाराज यांचे उपासना व भक्तीमधील भेदाबाबत विस्तृत विवेचन</u>

श्री गुलाबराव महाराज उपासना व भक्तीमधील भेदाबाबत म्हणतात की,

तेंव्हा प्रगटे भक्ती । पूर्ण परमेश्वरासक्ती ।
म्हणोनि उपास्मि आणि भक्ती । एक पांतीत न बैसवू ।। 6 ।।
आता उपासना भक्तिभेद । किंचित करु विशद
श्रोती ऐकता सारध । रितचि होय ।। 7 ।।
उपासना कर्म समान्वित । भक्तीने कर्माचा उपक्षय होता
कर्म अर्पिलिया उरत । प्रेमशेष ते भक्ती ।। 8 ।।

उपासना व भक्ती यातील महत्वाचा भेद म्हणजे उपासना ही उपासना करणाऱ्या कर्त्याच्या स्वाधीन असते. याउलट भक्ती ही प्रेम करणाऱ्याच्या स्वाधीन नसून ब्रम्हज्ञानाप्रमाणेच परब्रम्हरुप असलेले अवताररुप सगूण भगवान यांचे जसे वर्णन पुराणादिकातून आलेले असेल तसेच ते भक्त ग्रहण करीत असतो. हेच वस्तुतंत्र म्हणजे जशी वस्तु असेल तसेच तिचे ज्ञान ग्रहण करणे होय. उपासनेत, उपासना करीत असतांना कर्म केलेच पाहिजे असा दंडक आहे. कर्म सोडता येत नाही. केलेले कर्म भगवंताला अर्पण केल्यावर जे भगवंताविषयी प्रेम राहते तिला भक्ती असे म्हणतात. खरे तर उपासना ही भक्तीचे साधन आहे. त्यामुळे साधन व साध्य असा भेद उपासना व भक्तीत असल्यामुळे उपासनेहून भक्ती ही भिन्न आहे हे ओघानेच सिध्द होते.

विहित वैदिक कर्माचा त्याग करुफन उपासना केल्याने कोणी तरल्याचे इतिहासावरुन दिसून येत नाही. पण कर्माचा त्याग करुनही भक्ती केली असता तरुन गेल्याच्या कथा संतांच्या चरित्रातून दिसून येतात. उपासनेत विहित कर्माचा त्याग केल्यास उपासनेचे फळ मिळत नाही. त्यामुळे कर्म विरहित उपासनेने भगवत्प्राप्ती झाल्याचे इतिहासात एकही उदाहरण नाही. याच्या उलट अनेक संतांच्या चरित्रवरुन असे दिसून येते की, भगवत्प्रेमात तल्लीन झालेल्या संतांकडून बऱ्याचवेळा विहित कर्माचा त्याग झाला तरी त्यामुळे त्यांच्या भगवत्प्राप्तीत अडसर निर्माण झाला नाही उपासना व भक्तीतील याठिकाणी दाखविलेला भेद अधिकारानुरुप आहे उपासनेत कर्माचा अधिकारी आहे. तर भक्तीत भगवत्प्रेमाचा अधिकारी आहे. सगुण भगवंताच्या पुराणादिकांतून आलेल्या लीलांचे वर्णन ऐकून ज्यांचे चित्त भगवत्प्रेमाने द्रवित होते व भगवंताच्याच प्रेमाची ज्यांना तळमळ लागते त्या सर्वांना भक्तीचा अधिकार आहे. तेंव्हा उपासनेचे क्षेत्र मर्यादित असून भक्तीचे क्षेत्र अमर्याद आहे. हे यावरुन दिसून

येते. वारकरी तुकाराम महाराजादी संत असोत किंवा समर्थ संप्रदायातील संत असोत किंवा दत्त संप्रदायातील संत असोत यासर्व संतांनी केवळ नामसंकीर्तनादिनी परब्रम्हाची प्राप्ती करुन घेतली आहे. त्यांना कर्तृतंत्र अशा उपासनेचा आश्रय करावा लागला नाही. त्यामुळे भगवत्प्राप्तीला भावना प्रधान उपासनाच आवश्यक असल्याचे दिसत नाही.

अर्थातच उपासना ही भक्तीहून सर्वथा भिन्न आहे. हे साक्षात्कारी सर्व संप्रदायांच्या संतांच्या चरित्रावरुन दिसून येते. तुकारामादि संतांनी केवळ भगवान नाम स्मरणाने भगवत्प्राप्ती करुन घेतली. त्यामुळे भक्ती ही उपासनेहून वेगळी आहे. हे मात्र निश्चित.

उपासना आणि भक्ती यातील आणखी एक भेद कसा आहे हे सांगतांना श्री गुलाबराव महाराज म्हणतात की, उपासनेत उपासकाला भगवंताला नैवेद्य दाखविण्यापूर्वी मंत्रानी नैवेद्याचे अन्न पाणी शिंपडून म्हणजेच प्रोक्षण करुन नंतर नैवेद्य दाखवावा लागतो. प्रशिक्षणाशिवाय नैवेद्य उपासनेत प्रत्यवाय समजण्यांत येतो. पण प्रोक्षणादी विधी सारखा कोणताही विधी भक्तीत आवश्यक असल्याचे भक्ति शास्त्रात समजले गेले नाही. कारण भक्तीत प्रेम हे मुख्य आहे. भगवान रामचंद्रांनी भिल्लिणीची उष्टी बोरे प्रेमाने खाल्ली. त्यांनी खाण्यापूर्वी बोरे प्रोक्षण केली व नाही याचा विचार केला नाही. वाल्मिकी महर्षी प्रेमानेच, राम राम न म्हणता उलटा जप करुनही कोणताही प्रत्यवाय न होता ऋषी पदास प्राप्त झालेत. अशा तऱ्हेच्या संतांच्या चरित्रातील उदाहरणावरुन उपासना व भक्ती यामधील भेदू स्पष्टपणे दिसून येतो.

## <u>उपासना व भक्तीची विभागणी</u>

श्री गुलाबराव महाराजांच्या मते उपासना व भक्ती हे दोन मार्ग भिन्न आहेत. पांचभौतिक वस्तूंच्या ठिकाणी ईश्वर भावना ठेवून उपासना होते व पांचभौतिक नसलेल्या अशा अवतारांच्या ठिकाणी भक्ती होते. भावना ही नेहमीच कर्तृतंत्र असते म्हणून उपासना ही कर्तृतंत्र आहे आणि इतिहासाच्या प्रमाणावरुन अवतार हे वस्तुतंत्र असल्यामुळे भक्ती ही वस्तूतंत्र आहे. धातू पाषाणादी पांचभौतिक पदार्थ्यांच्या ठिकाणी ईश्वर भावना करुन उपासना केली जाते. ही उपासना अर्थातच भावनारुप असल्यामुळे कर्तृतंत्रच असते. या उपासनेत वैदिक मंत्राचा उपयोग होतो. त्यामुळे ती कर्मसमुच्चयात्मक राहते. हया उपासनेला अवतारांच्या मूर्तीची उपासना मात्र अपवाद आहे. कारण तेथे भावना नसून ज्ञान आहे. ही उपासना करित असतांना उपासकांच्या अंत:करणात त्या मूतीच्या अवतार स्वरुपाचा आकार येतो. तो स्थिर होऊन त्याचे ध्यान दृढ होत जाते व भागवतादी पुराणातून ऐकलेल्या लीलांनी भगवत्प्रेमाने अंत:करण द्रवित होते. मूर्तीचा जडभाव निघून जावून केवळ आनंदघन अवतार शरीरच अंत:करणात ठसून राहते. ही उपासना मात्र भक्तीत परिणत होते व हिला गौण भक्ती म्हणतात. हयाचेही कारण हेच की, मूर्तीचा अंत:करणात ठसलेला आकार हा वस्तूतंत्र अशा अवतार शरीराचा असतो व तो पुराणादिकांच्या वाचनाने किंवा श्रवणाने उपासकाने प्रेमाने ध्यानात घेतला असतो. मूर्तीचा जडभाव जोपर्यंत कायम आहे. तोपर्यंत उपासना म्हणून कर्तृतंत्रात व तो नाहीसा होऊन तो आकार चिदानंदरुप प्रतीत होताच भकतीला सुरुवात होते व ती वस्तूतंत्रेत समाविष्ट

होते. अशी ही उपासना व भक्तीची विभागणी आहे. रामायण व महाभारतादी इतिहासावरुन श्रीरामकृष्णादिकांचे अवतार झाल्याचे आपल्याला ज्ञान होते. हे अवतार प्रत्यक्ष झालेले असल्यामुळे त्यांचे ज्ञान ते परब्रम्हस्वरुप असल्यामुळे निर्गुण परब्रम्हाप्रमाणेच यथार्थ असते. त्यामुळे त्या अवतार शरीरांच्या ठिकाणी ते स्वतःच ईश्वर असल्यामुळे भाना करण्याचा प्रश्न उत्पन्न होत नाही. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी केलेली अहेतुक प्रेमरुप भक्ती ही वस्तुतंत्ररुप आहे. उपासनेप्रमाणे कर्तृतंत्रप्ररुप नाही हे ओघानेच सिध्द होते.

## उपासना व भक्तीची आवश्यकता

उपासना व भक्ती यामध्ये मूलभेद असतो आणि उपासना व भक्ती हे दोन्ही भिन्न मार्ग असले तरी दोन्हीची आवश्यकता असते. याबाबत गुलाबराव महाराजांनी विस्तृत विवेचन केले आहे. श्री महाराज म्हणतात की, " वेदांनी सांगितलेले विहित कर्म व उपासना हया केल्याशिवाय भक्तींची प्राप्ती होणे कठीण आहे. तेंव्हा अंतःकरणातून वासना म्हणजे विषयांची आसक्ती पूर्णपणे नाहीशी होऊन अंतःकरण सत्वप्रधान बनण्याकरिता पहिल्याने विहित कर्म व उपासना याचे अनुष्ठान निश्चयाने चालू द्यावे. पहिल्याने कर्म व उपासना करावी त्यामुळे अंतःकरण शुध्द होऊन अज्ञान व विक्षेप नाहीसे होतात. " अशारितीने उपासना ठामपणाने चालू द्यावी. श्री गुलाबराव महाराज म्हणतात की,

" आधी करावे कर्म उपासना । तेणे मळविक्षेप निराकरण ।
तैसेचि पुढे उपासणा दृढ चालवावे ।। 31 ।। "

रामायण, महाभारत, श्रीमद्‌भागवतादिकातून व संतांच्या अभंगादिकातून रामकृष्णादी अवतारांच्या लीला वर्णन केलेल्या आहेत. त्या लीला ऐकून किंवा संतांच्या चरित्रातून भगवंतांनी त्यांच्या बरोबर केलेल्या अनेक प्रेम प्रसंगांच्या वर्णनावरुन आपल्या अंतःकरणात भगवंताविषयी एक प्रकारचे कुतुहलयुक्त आकर्षण निर्माण होते व त्याची परिणती हळू हळू त्यांच्या प्रेमात होते. मूर्तीची पूजा करतांना ती धातूची असली तरी तो आकार अनंत ब्रम्हांडनायक सच्चिदानंदरुप परब्रम्हाचा आहे. हे ज्ञान त्यामुळेच अंतःकरणात राहते व मूर्तीविषयी आदरयुक्त भावना स्थिर होऊ लागते. अंतःकरण भगवंताच्या प्रेमाने द्रवित होऊ लागते व जडपणाचा विसर पडून अंतःकरणात तो आकार चैतन्याच्या तीव्रभावनेने जसलसा स्थिर होत जातो तस तसा तो आकार चैतन्याचे रुप धारण करुन चैतन्यमय भासतो व भगवंताचा अंतःकरणात आविर्भाव होतो. अवतारस्वरुप रामकृष्णादी मूर्तीची उपासना कशी करायची या संबंधी श्री. महाराज सांगतात की, भगवान रामकृष्णादी अवतारांच्या मूर्ती उपासकाने पूजे करता समीर ठेवून त्यांच्या ठिकाणी मूर्तीच्या भावनेने पूजादिकांचा सोहळा करीत जावा. त्यांच्या विषयी जसजशी प्रेमाची तीव्र भावना होत जाईल तसतसा अंतःकरणात अवताराचा आकार स्थिर होऊन अवतार स्वरुप प्रगट होत जातील.

" पुढे घेवोनिया मूर्ती । जैसी भावनया वाढे उपास्ती ।
तैसी अंतःकरणी अवताररुपी प्रकटत जाय ।। 30 ।। "

इंद्रियाद्वारे होणा-या सर्व क्रिया अनेक प्रकारच्या दिसत असल्या तरी त्या सर्वांतून प्रेमाचा एकच धागा अनुस्यूत असल्यामुळे ते सर्व भजन असून तीच भक्ती होय. या सर्व इंद्रियाद्वारा भगवंताचे प्रेमच प्रगट होते. कर्तव्यबुध्दी उत्पन्न न होता केवळ भगवत्प्रेमानेच इंद्रियांचे सर्व व्यापार होऊ लागल्यामुळे अंत:करणात एक भगवत्प्रेमच भरुन राहते. कानाने भगवंताचे गुण श्रवण करणे, मुखाने भगवंताचे गुणवर्णन करणे, हाताने गंधपुष्पादी षोडोपचारांनी भगवंताच्या मूर्तीची पूजा करणे, पायांनी भगवंताच्या मंदिरात जाणे किंवा यात्रा करणे. नाकाने भगवंताच्या निर्माल्याचा सुवास घेणे, डोळयांनी भगवंताचे श्यामसुंदर, मूर्ती पाहणे, मन व बुध्दी भगवंताच्या प्रेमात निमग्न असणे, इत्यादी सर्व गोष्टी केवळ भगवंताच्या प्रेमामुळेच घडत असल्यामुळे त्या सर्व क्रिया भजनरुपच आहेत व हे सर्व प्रकार प्रेमाचेच आहेत.

उपासनेत क्रिया मुख्य असते. वैदिक उपासना कर्मसमुच्चित असते. बाहय उपचारांना जास्त महत्व असते. प्रेमाला गौणत्व असते. भक्तीत प्रेम मुख्य असते. बाहय उपचार न मिळाले तरी चालले जाते. प्रेमाने एक तुलसीदल वाहिले तरी भगवान प्रसन्न होतो. सर्व पूजा अर्चनादि क्रिया प्रेमाने होत असतात. प्रारब्धाने जे जे कर्म घडते ते ते सर्व भगवदर्पण होत असते. प्रेम मुख्य असून क्रिया गौण असते. उपासना फलद्रुप होण्यासाठी कर्मानुष्ठान आवश्यक असते. म्हणजे उपासना कर्मसमुच्चित असते. कर्मानुष्ठान न केले तर उपासना कळत नाही. भक्तीत आपल्या प्रिय भगवंताची आज्ञा म्हणून धर्माचरण आणि कर्मानुष्ठान होत असते. कर्मानुष्ठान न झाले तरी भक्तीत वैगुण्य येत नाही. पण भगवंतावरील प्रेमामुळे त्याची आज्ञा भक्ताला मोडता येत नाही. म्हणून धर्मानुसार आचरण होत असते. त्यात कर्माची अपरिहार्यता नसते.

**सारांश :**

भारतात आध्यात्म हा जीवनाचा पाया मानला जातो. आध्यात्मात उपासना व भक्ती. हे दोन महत्वाचे टप्पे आहेत. उपासना ही ज्ञानाच्यापूर्वी असते आणि भक्ती ज्ञानोत्तर असते. हा उपासना व भक्तीमधील भेद श्री गुलाबराव महाराजांनी अतिशय विस्तृतपणे स्पष्ट केला आहे. उपासना व भक्ती यामध्ये मूलभूत भेद असला तरी दोन्हीचीही आवश्यकता आहे. असे श्री गुलाबराव महाराज यांनी आग्रहाने प्रतिपादित केले आहे.

**संदर्भ :**


1) श्री. गुलाबराव महाराज, जीवन आणि तत्वज्ञान, डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर, इंद्रायणी साहित्य, पुणे
2) श्री. गुलाबराव महाराजांची विचारसंपदा, डॉ. कृ.मा.घटाटे, प्रकाशक : प्रज्ञाचक्षु संत श्री गुलाबराव महाराज कात्सायनी शताब्दी ज्ञानयज्ञ महोत्सव समिती, माधान, जि. अमरावती
3) प्रज्ञाचक्षु श्री. गुलाबराव महाराज यांचे विचारवैभव प्रकाशक : भारतीय विचार मंच, नागपूर

4) गीत गुलाब, श्री. गुलाबराव महाराज, प्रकाशक : श्री गुलाबराव महाराज भक्तिधाम, चांदूर बाजार, अमरावती
5) भगवत् भक्तिसौरभ, श्री गुलाबराव महाराज, प्रकाशक : स्कंददास स्मारक ग्रंथ न्यास, मुंबई
6) धर्मयज्ञ, प्रज्ञाचक्षु श्री. गुलाबराव महाराज विशेषांक, प्रकाशक : गीता फाऊंडेशन, मिरज
7) श्री. गुलाबराव महाराज जीवन व तत्वज्ञान, डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर, इंद्रायनी साहित्य, पुणे

नित्यपाठ, श्री गुलाबराव महाराज, प्रकाशक : श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, अमरावती.